# शास्त्र शाखेतील शिक्षण-संशोधनासाठी

# 'आयसर'ची स्थापना

## 'एनसीएल'चे 'बॉर्डरलेस एज्युकेशन'

पुणे (प्रतिनिधी) : शास्त्र शाखेतील कोणत्याही विषयाचे शिक्षण घेण्यासाठी आणि विशिष्ट संशोधन करण्यासाठी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्चची ('आयसर') स्थापना करण्यात आली आहे. 'आयआयटी फॉर इंजिनिअरिंग अँड आयसर फॉर सायन्स' असे वर्णन करण्यात येत असलेली ही देशातील पहिलीच संस्था आहे. पहिल्या टप्प्यात पुणे आणि कोलकता येथे येत्या १६ ऑगस्ट रोजी 'आयसर'च्या पहिल्यावहिल्या विद्यार्थी तुकडीचा अभ्यासक्रम सुरू होणार आहे. भारतात वैज्ञानिकांची नवी पिढी घडविण्यासाठी स्थापण्यात आलेल्या या स्वायत्त विद्यापीठातील विद्यार्थ्यांना पाच वर्षांच्या अभ्यासक्रमानंतर 'मास्टर ऑफ सायन्स' ही पदवी मिळणार आहे.

राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे ('एनसीएल') संचालक डॉ. एस. शिवराम यांनी सांगितले, "बारावी झालेल्या विद्यार्थ्यांना थेट विज्ञानातील संशोधनाची संधी देणारा हा भारतातील पहिलाच उपक्रम आहे. 'बॉर्डरलेस एज्युकेशन' हे या अभ्यासक्रमाचे वैशिष्ट्य असणार आहे. लवकरच चंडीगड

(पान ४ वर)

### 'आयसर'मधील अभ्यासक्रम

- बारावीनंतर पाच वर्षांचा 'मास्टर्स' अभ्यासक्रम
- 'बी. एस्सी,' नंतर पीएच. डी.
- एम. एस्सी नंतर पीएच. डी.

# शास्त्र शाखेतील शिक्षण-संशोधनासाठी 'आयसर'ची स्थापना

(पान १ वरून) येथे 'आयसर'चे तिसरे केंद्र सुरू करण्यात येणार असून, येत्या दोन-तीन वर्षांत तीन हजार विद्यार्थ्यांना 'आयसर'मध्ये प्रवेश देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.'' पंतप्रधानांच्या वैज्ञानिक सल्लागार परिषदेच्या सूचनेवरून मनुष्यबळ विकास मंत्रालयाने या केंद्रांची स्थापना करण्याचा निर्णय घेतला. दरम्यान, पुण्यातील 'आयसर'चे प्रमुख संचालक म्हणून 'एनसीएल'मधील वरिष्ठ संशोधक डॉ. के. एन. गणेश हे काम पाहणार आहेत.

डॉ. शिवराम यांनी सांगितले, ''अभ्यासक्रमाच्या पहिल्या दोन वर्षांमध्ये भौतिकशास्त्र, जीवशास्त्र, रसायनशास्त्र, भूगर्भशास्त्र, जैवतंत्रज्ञान, खगोलशास्त्र आदी विज्ञानाच्या अस्तित्वात असलेल्या सर्व शाखांचा अभ्यास करण्याची संधी मिळणार आहे. या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना संपूर्ण वर्षाचे भवितव्य एकदाच ठरवणारी वार्षिक परीक्षा द्यावी लागणार नाही. तर सत्र परीक्षा, पूर्वसूचनेशिवाय घेतल्या जाणाऱ्या चाचण्या, 'क्रेडिट', ग्रेड आदी प्रकारे विद्यार्थ्यांची गुणवत्ता मोजली जाईल. वार्षिक परीक्षेला फक्त तीस टक्के महत्त्व देण्यात आले आहे. ज्या विषयामध्ये विद्यार्थ्याला जास्त गती असेल किंवा ज्याची आवड असेल, त्या विषयात त्याला उच्च शिक्षण घेता येईल. पारंपरिक पद्धतीनुसार गणित विषयाच्या विद्यार्थ्याने त्याच विषयात पुढील अभ्यासक्रम पूर्ण करायचा असे कोणतेही बंधन घालण्यात आलेले नाही.''

डॉ. गणेश म्हणाले, की संगणक, अभियांत्रिकी आणि जैवतंत्रज्ञानाच्या आकर्षणामुळे शास्त्र शाखेतील संशोधनाकडे वळणाऱ्या बुद्धिमान विद्यार्थ्यांची संख्या कमी झाली आहे. शास्त्र शाखेतील संशोधनाचे महत्त्व वाढविण्यासाठी 'आयसर'मध्ये विद्यार्थ्यांना अत्यंत दर्जेदार आणि अद्ययावत सुविधा पुरविल्या जाणार आहेत. या विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी भारत, तसेच भारताबाहेरील सर्वोत्कृष्ट प्राध्यापक-संशोधकांना बोलाविले जाणार आहे. डॉ. शिवराम म्हणाले, ''येत्या दहा-पंधरा वर्षांत जगामध्ये सर्वांत मोठे 'टॅलंट वॉर' सुरू होणार आहे. त्या वेळी सर्वांत मोठी उणीव ही संशोधक-शास्त्रज्ञांची भासणार आहे. हे लक्षात घेऊन विज्ञानाच्या विविध शाखांमध्ये पारंगत असलेल्या शास्त्रज्ञांची फळी निर्माण करण्याचे ध्येय 'आयसर'ने ठेवले आहे.''

■ **प्रवेशपात्रता**

यंदा 'मास्टर्स' अभ्यासक्रमाला ७० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला असून, त्यांची निवड 'आयआयटी जेईई' आणि 'केव्हीपीवाय' आणि 'ऑलिम्पियाड'मधून करण्यात आली आहे. 'पीएच.डी.' अभ्यासक्रमासाठी पुढील वर्षीपासून प्रवेश दिले जाणार आहेत. 'आयसर'च्या प्रवेशासाठीची वेगळी स्वतंत्र व्यवस्था पुढील वर्षापासून लागू करण्यात येणार आहे. त्याची नियमावली अजून निश्चित करण्यात आलेली नाही.

■ **आर्थिक मदत आणि शैक्षणिक शुल्क :**

'आयआयटी'प्रमाणचे 'आयसर'मध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा संपूर्ण खर्च सरकार करणार आहे. 'आयसर'मधील शिक्षण सुरू असताना प्रत्येक विद्यार्थ्याला दरमहा तीन हजार रुपयांची 'फेलोशिप' देण्यात येणार आहे, त्यातून त्याचे शैक्षणिक शुल्क, निवास व भोजन व्यवस्थेचा खर्च भागविण्यात येणार आहे. अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत सर्व विद्यार्थ्यांनी 'आयसर'च्या वसतिगृहात राहणे बंधनकारक असणार आहे.

■ **'आयसर' नंतर पुढे काय?**

डॉ. शिवराम यांनी सांगितले, अत्यंत प्रभावी आणि खात्रीशीर प्लेसमेंट व्यवस्था निर्माण केली जाणार आहे, परंतु सद्यःस्थिती पाहता देश-परदेशांतील अनेक कंपन्या, संशोधन संस्था, सरकारी संस्था आदींना दर्जेदार संशोधकांचा तुटवडा जाणवतो आहे. त्या दृष्टीने 'कॅम्पस इंटरव्ह्यू' घेतले जातील. 'आयसर'मध्ये निवडल्या जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे भवितव्य 'आयआयटी'तील विद्यार्थ्यांइतकेच उज्ज्वल असणार आहे.

सविस्तर माहितीसाठी संपर्क : इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्च,

९००, 'एनसीएल' इनोव्हेशन पार्क, डॉ. होमी भाभा मार्ग पुणे, पीन - ४११ ००८, दूरध्वनी - (०२०) २५९०२३२

संकेतस्थळ : www.iiserpune.ac.in